# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date: 20 May 2024

## Time: 7.10 AM to 7.20 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक: २० मे २०२४ सकाळी ७.१० मि.

****

*ठळक बातम्या*

- **लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यात आज मतदान–महाराष्ट्रात १३ मतदार संघात एकूण २६४ उमेदवारांमध्ये लढत**
- **राज्यात २४ हजारावर मतदान केंद्रांवर, सुमारे अडीच कोटी मतदार बजावणार मतदानाचा हक्क**
- **काँग्रेसचे ज्येष्ठ नेते प्रतापराव भोसले यांच्या पार्थिव देहावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार**
- **जालना जिल्ह्यात वाळू तस्करांवर प्रशासनाची धडक कारवाई–कोट्यवधीचा मुद्देमाल जप्त**
- **थायलंड खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत चिराग–सात्विक जोडीला पुरुष दुहेरीचं विजेतेपद**

**आणि**

- **नैऋत्य मोसमी पाऊस निकोबार बेटांवर दाखल**

***आता सविस्तर बातम्या***

लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यातल्या मतदानाला नुकतीच सुरुवात झाली. देशभरातल्या आठ राज्यातल्या ४९ लोकसभा मतदार संघात, ९४ हजारांहून अधिक मतदान केंद्रांवर, आठ कोटी ९५ लाख मतदार, आपला मतदानाचा हक्क बजावतील. दरम्यान, ओडीशात विधानसभा निवडणुकीसाठी आज मतदान होत आहे.

राज्यात लोकसभेच्या उत्तर मुंबई, उत्तर मध्य मुंबई, दक्षिण मुंबई, दक्षिण मध्य मुंबई, वायव्य मुंबई, ईशान्य मुंबई, धुळे, दिंडोरी, नाशिक, पालघर, भिवंडी, कल्याण आणि ठाणे या १३ मतदारसंघात आज मतदान होत आहे. या सर्व मतदारसंघांत एकूण २६४ उमेदवार निवडणूक रिंगणात असून, यामध्ये अरविंद सावंत, पियुष गोयल, अमोल कीर्तिकर, उज्जल निकम, वर्षा गायकवाड, हेमंत गोडसे, श्रीकांत शिंदे, भारती पवार, आणि शांतिगिरी महाराज आदींचा समावेश आहे. या सर्व उमेदवारांसाठी २४ हजार ५७९ मतदान केंद्रांवर, दोन कोटी ४६ लाख ६९ हजार ५४४ मतदार, आपला मतदानाचा हक्क बजावणार आहेत.

मुंबई उपनगर जिल्ह्यातल्या २६ विधानसभा मतदारसंघात, एकूण सात हजार ३८४ मतदान केंद्रं आहेत. या मतदान केंद्रांवर ४० लाख दोन हजार ७४९ पुरुष, ३४ लाख ४४ हजार ८१९ महिला, तर ८१५ तृतीयपंथी असे एकूण ७४ लाख ४८ हजार ३८३ मतदार आहेत.

ठाणे जिल्ह्यातल्या भिवंडी, कल्याण आणि ठाणे या लोकसभा मतदारसंघात, सुमारे ६६ लाख ७८ हजार ४७६ मतदार, सहा हजार ६०४ मतदान केंद्रांवर मतदानाचा हक्क बजावणार आहेत.

पालघर लोकसभा मतदार संघात दोन हजार २७० मतदान केंद्र आहेत. यासाठी १३ हजार ९२१ मतदान कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

नाशिक जिल्ह्यात चार हजार मतदान केंद्र आहेत. यापैकी दिंडोरी मतदार संघासाठी एक हजार ९२२ तर नाशिक मतदार संघासाठी एक हजार ९१० मतदान केंद्र उभारण्यात आली आहेत.

धुळे मतदारसंघात एकूण एक हजार ७०४ मतदान केंद्रांवर सुमारे साडेआठ हजार कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

दरम्यान, मतदानाच्या दृष्टीने प्रशासनाने जय्यत तयारी केली आहे. याआधीच्या टप्प्यांमध्ये मतदानाची कमी टक्केवारी पाहता मतदानाचं प्रमाण वाढवण्याचे प्रयत्न निवडणूक आयोग करत आहे. मतदारांनी मतदानाचं कर्तव्य बजावण्याचं आवाहन अनेक मान्यवरही करत आहेत.

प्रसिद्ध उद्योजक आणि टाटा उद्योग समूहाचे प्रमुख रतन टाटा यांनी सर्व मतदारांना मतदानाचा घटनात्मक हक्क बजावण्याचं आवाहन केलं आहे. याबाबतचा एक ट्विट संदेश त्यांनी जारी केला.

****

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, निवडणूक आयोगानं विविध ठिकाणांहून एकूण आठ हजार ८८९ कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. यामध्ये चार हजार कोटी रुपयांच्या अंमली पदार्थांचा समावेश आहे. मुंबई उत्तर-पूर्व लोकसभा मतदारसंघात एकूण सहा लाख ७३ हजार ९२५ रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला, याप्रकरणी ५५ गुन्हे दाखल झाले असून, ५६ जणांना अटक करण्यात आल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते प्रतापराव भोसले यांच्या पार्थिव देहावर काल सायंकाळी सातारा जिल्ह्यात त्यांच्या काल भुईंज इथं शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. राज्य शासनाच्या वतीने राज्याचे उत्पादन शुल्क मंत्री शंभूराज देसाई, खासदार श्रीनिवास पाटील यांनी पुष्पचक्र अर्पण करून श्रद्धांजली वाहिली. पोलीस दलाने हवेत बंदुकीच्या फैरी झाडून मानवंदना दिली. भोसले यांचं भुईंज इथं काल पहाटे वृद्धापकाळानं निधन झालं, ते नव्वद वर्षांचे होते. भुईंज गावचे सरपंच म्हणून राजकीय कारकिर्दीला सुरुवात करणाऱ्या भोसले यांनी, चार वेळा आमदार तर सातारा लोकसभा मतदारसंघातून तीन वेळा लोकसभेत खासदार म्हणून, तसंच विविध राष्ट्रीय समित्यांवर काम केलं होतं.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी भोसले यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे. भोसले यांच्या निधनाने सुसंस्कृत, निष्ठावान नेतृत्व हरपलं असल्याचं पटोले यांनी म्हटलं आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांनीही भोसले यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केलं आहे.

****

आषाढी एकादशी सोहळा यंदा १७ जुलै रोजी साजरा होत आहे. या पार्श्वभूमीवर सात ते २४ जुलै दरम्यान पंढरपुरात श्री विठ्ठल आणि रुक्मिणी मातेचं दर्शन २४ तास सुरू ठेवण्यात येणार आहे. मंदिर व्यवस्थापनाचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी ही माहिती दिली. दर्शन रांग, दर्शन मंडप इथं व्यवस्थेसाठी दोन हजार कर्मचारी, स्वयंसेवकाची नेमणूक करण्यात येणार आहे. तसचं भाविकांना अधिकाधिक सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्याच्या सूचना प्रशासनाला केल्याची माहिती शेळके यांनी दिली.

****

जालना जिल्ह्यात अवैध वाळू उत्खननाविरोधात महसूल विभागाने काल धडक कारवाई करून अनेक वाहनं तसंच वाळूसाठ्यासह कोट्यवधी रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली तसंच अपर जिल्हाधिकारी रिता मेत्रेवार आणि निवासी उपजिल्हाधिकारी सोहम वायाळ यांच्या नेतृत्वाखाली, जालना, बदनापूर, घनसावंगी, जाफ्राबाद या तालुक्यात ही कारवाई करण्यात आली. बदनापूर तालुक्यात सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल करून, सुमारे एक कोटी ६२ लाख ९७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तर घनसावंगी तालुक्यात ७५ लाख रुपयांचा, आणि जाफ्राबाद तालुक्यात, अडीच लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जिल्ह्यात अवैध वाळू उत्खनन केल्याचं निदर्शनास आल्यास संबंधिताविरुद्ध कायदेशीर कारवाईचा इशारा जिल्हाधिकाऱ्यांनी दिला आहे.

****

धाराशिव जिल्हातल्या कळंब तालुक्यात कल्याण राठोड या तलाठ्यावर लाच घेतल्या प्रकरणी गुन्हा दाखल झाला आहे. शेत जमिनीची फेरफार नोंद घेण्यासाठी त्यानं तीन हजार रुपयांची लाच घेण्याची तयारी दर्शवली. राठोड याच्याकडे कळंब तालुक्यातल्या आंदोरा या सज्जाचा तलाठी पदाचा कार्यभार असून, ईटकुर सज्जाचा अतिरिक्त कार्यभार आहे.

****

भारतीय बॅडमिंटनपटू चिराग शेट्टी आणि सात्विक साईराज रंकीरेड्डी जोडीने थायलंड खुल्या बॅडमिंटन स्पर्धेच्या पुरुष दुहेरीचं विजेतेपद पटकावलं आहे. काल बँकॉक इथं झालेल्या अंतिम सामन्यात सात्विक – चिराग जोडीने के चेन बो यांग आणि लियू यी को, या चिनी जोडीचा, २१–१५, २१–१५ असा सरळ दोन गेम्समध्ये पराभव केला.

****

इंडियन *प्रीमियर* लीग – आयपीएल क्रिकेट स्पर्धेत काल सनराईजर्स हैदराबादनं पंजाब किंग्जचा चार गडी राखून पराभव केला. तर दुसरा राजस्थान रॉयल्स आणि कोलकाता नाईट रायडर्स मधला सामना पावसामुळे रद्द झाला.

या स्पर्धेत आता कोलकाताचा संघ पहिल्या, हैदराबादचा दुसर्या, राजस्थान रॉयल्स तिसर्या, तर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु चौथ्या स्थानावर आहे. उपान्त्य फेरीचा पहिला सामना उद्या अहमदाबाद इथं हैदराबाद आणि कोलकता संघांमध्ये होणार आहे.

****

नैऋत्य मोसमी पावसाचं निकोबार बेटांवर आगमन झालं आहे. हवामान विभागानं काल ही माहिती दिली. निकोबार द्वीप समूह, दक्षिण अंदमानचा समुद्र तसंच बंगालच्या खाडीच्या काही भागाकडे मोसमी पावसाचा प्रवास सुरू आहे. येत्या ३१ मे पर्यंत मोसमी पाऊस केरळात दाखल होण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.

दरम्यान, काल अनेक ठिकाणी पाऊस झाला. छत्रपती संभाजीनगर शहर परिसरात काही भागात काल दुपारनंतर जोरदार वाऱ्यासह पावसाच्या सरी कोसळल्या.

मराठवाडा आणि विदर्भात पुढचे दोन दिवस सोसाट्याचा वारा, मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

दरम्यान, राज्यात काल सर्वाधिक ४४ पूर्णांक दोन शतांश सेल्सिअस तापमान जळगाव इथं नोंदवलं गेलं. त्याखालोखाल अकोला इथं ४३ पूर्णांक दोन शतांश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. मराठवाड्यात छत्रपती संभाजीनगर इथं ४० अंश सेल्सियस, धाराशिव ३९ पूर्णांक आठ, परभणी ३९ पूर्णांक सहा तर नांदेड इथं ३७ पूर्णांक २ शतांश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली.

****

परभणी जिल्हा तलाठी संघाची नूतन कार्यकारणी एकमताने निवडण्यात आली. जिल्हाध्यक्ष पदी श्यामसुंदर सूर्यवंशी, कार्याध्यक्षपदी रामप्रसाद कोल्हे, तर उपाध्यक्षपदी शंकर राठोड यांची निवड करण्यात आली. महाराष्ट्र राज्य तलाठी संघाचे अध्यक्ष अनिल सूर्यवंशी यांच्या अध्यक्षतेखाली काल झालेल्या बैठकीत ही निवड प्रक्रिया पार पडली.

****

घ़ाटकोपर जाहिरात फलक दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर लातूर शहरातल्या अनाधिकृत फलकांवर महानगरपालिका प्रशासनाकडून कारवाई सुरू आहे. महानगर पालिकेनं मोठ्या आकाराचे तीन फलक आणि आठ बॅनर नियमबाह्य ठरवले असून, फलक लावलेल्या खासगी त्या मालमत्ता धारकांना फलक उतरवण्यासाठी आज सोमवार पर्यंतची मुदत दिली आहे. यासंदर्भात दुर्घटना झाल्यास, संबंधित आस्थापना आणि मालमत्ताधारकांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात येईल, असा इशारा, लातूर महापालिकेने दिला आहे.

****

मुंबईच्या सांस्कृतिक कलादर्पणचा यंदाचा नाट्यसेवा गौरव पुरस्कार डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नाट्यशास्त्र विभागातले निवृत्त प्राध्यापक डॉ. जयंत शेवतेकर यांनाजाहीर झाला आहे. मुंबईत भायखळा इथल्या लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नाट्यगृहात येत्या २३ मे रोजी हा पुरस्कार त्यांना प्रदान केला जाईल.

****